# गौराई तुझं जाणं ग, आता कधी येणं ग !

**...म्हणूनच गौरीची म्हणजे पर्यायाने शेतीचा शोध लावणाऱ्या स्त्री–देवतेची पूजा भाद्रपदात केली जाते. दोऱ्याचे १६ पदर आणि १६ गाठी हे भाताचे पीक येण्यासाठी लागणाऱ्या १६ आठवड्यांचं प्रतीक आहे... देवी म्हणजे ती वेगळी नाही, ती आपलीच प्राचीन पूर्वज आहे, देवदानवा नरे निर्मिले हे खरेच आहे...**

स्त्रियांवर बलात्कार होत आहेत, कित्येक घरात बायकांना सतत मारहाण ठरलेलीच आहे. मुलींची लग्ने हुंड्याविना होत नाहीत. कुटुंबात आणि समाजात स्त्रीला कनिष्ठ स्थान आहेच. चित्रपट आणि नाटकातून तिच्या देहाचा बाजार भरवून गल्ला भरवला जात आहे ! स्त्रीच्या बाबत समाजाचा दृष्टीकोन असा असला तरी धार्मिक क्षेत्रामध्ये मात्र स्त्री देवता मोठ्या प्रमाणात दिसून येतात. एकीकडे स्त्रीला भोगदासी करायचे तर दुसरीकडे स्त्री देवतांची आरती करून 'सद्भावे मनोभावे' पूजा करायची! भारतामध्ये अनेक स्त्री देवतांची पूजा केलेली आपल्याला दिसून येते.

वर्षाचे १२ महिने कुठला ना कुठला तरी सण, उत्सव चालूच असतात. प्रत्येक सणाला जोडून कसले ना कसले तरी व्रत जोडलेलेच असते. ही व्रते असतात फक्त स्त्रियांसाठी ! या व्रतामधून कडक उपवासासारखे कर्मकांड करून स्त्रिया मागतात ते कुटुंबासाठी समृद्धी, स्थैर्य ! हरितालिका, मंगळागौरी सारख्या व्रतांमधून नवऱ्यासाठी सुरक्षितता आणि पोतेऱ्यासारखी वागणूक देणाऱ्या नवऱ्याचीही सात जन्म मिळावा म्हणून मागणी ! सुरक्षिततेसाठी.– या जन्मातल्या आणि पुढच्याही, असे व्रत रुपी अर्ज आणि विनंत्या ! तिचे स्वतःचे व्यक्तिमत्व, तिची कार्यक्षमता तिच्यातील विकसनशील असणारे गुण, शक्ती या अशा व्रतातून लोप पावलेल्या दिसतात. आर्थिक गुलामगिरीतून तिला बौद्धिक आणि मानसिक गुलामगिरी आलेली दिसते. आज सुशिक्षित आणि अशिक्षित स्त्रियाही ज्या आंधळेपणाने व्रतवैकल्ये करत असतात त्यामधून हे दिसून येते.

समाज सतत बदलत आहे. आपल्या आजूबाजूच्या परिस्थितीत जसा बदल घडत गेला, तसतसे आपल्या रोजच्या जीवनात काही फरक घडून आले. धोतर किंवा नऊवारी साडी हा पोशाख जाऊन सुटसुटीत असा पँट–शर्ट, पाचवारी साडी किंवा मुलींसाठी पँट–शर्ट हा पोशाख आला. पाळण्याला बाशिंग लावून जी लग्ने होत, ती आता मुलामुलींचे शिक्षण संपूर्ण झाल्यावर आणि त्यांच्या आवडीनिवडी पाहून होत आहेत. ग्रामीण भागातसुद्धा १५।१६ वर्षाच्या मुलीला लग्नघरी ढकललं जात नाही तर तिच्या आवडीचा विचार करण्याची प्रवृत्ती वाढत आहे. पावाने बाटेल म्हणून पाव न खाणारे आज सकाळचा सुटसुटीत पदार्थ म्हणून पाव चहा खाऊ लागले आहेत. या सर्वांवरूनच आजूबाजूच्या भौतिक परिस्थितीत फरक पडत गेला तसेच आपल्यात आपल्याला बदल करावा लागला. पण धार्मिक बाबतीत मात्र आपल्यात काहीच फरक पडत नाही, असे दिसते. आपल्या सर्वच दुःखाचे मूळ बाजूच्या भौतिक परिस्थितीत आहे, हे समजावून न घेता देव, धर्म, बुवाबाजी, अंगारे, धुपारे, गंडे, दोरे, लिंबू या गोष्टींमागे केवळ अशिक्षित नाही तर सुशिक्षित वर्गही धावताना दिसतो. आणि हे प्रमाण स्त्रियांमध्ये तर खूप मोठ्या प्रमाणात दिसते. वेगवेगळी व्रते करताना त्यामध्ये काही चूक होऊ नये. व्रत ज्या देवाचे वा देवीचे त्याचा कोप होऊ नये म्हणून काळजी घेतात. पण हे व्रत का ? माझी दुःखे हे व्रत दूर करेल का ? ... ज्याचा

विचार केला जातो का ? आपण जे देवदेवता पूजितो, भजन करतो ते आले कुठून? ही व्रते का आली? त्याचा अर्थ काय ? ह्या गोष्टीचा आपण विचार करतो का ?

आपल्या सामाजिक जीवनाचा भाग, सांस्कृतिक जीवनाचा भाग म्हणून सण येतात. महाराष्ट्रात गणपती, गौरी उत्सव मोठ्या प्रमाणावर मोठ्या डामडौलात साजरे होतात. कोकणातून मुंबईला आलेल्या कामगारांना रजेचे वेध लागतात. शहरामध्ये रोषणाई करून गणेश उत्सव १० दिवस साजरा होतो.

## गौरीचं सगळं शिस्तीत व्हायला हवं !

पहिल्या दिवशी गणपती बसतात आणि मग खरं तर या दहा दिवसाच्या उत्सवाच्या खऱ्या नायिका होतात त्या गौरीच ! गौरी बसवण्याचे जे विविध विधी आहेत ते का ? गौरीची पूजा का ? गौरी आल्यावर त्यांना धान्याचे डबे, स्वयंपाकघर का दाखवायचे ? अंगणापासून, जिन्यापासून उंबऱ्यापर्यंत पावले का काढायची ? यामागे काय परंपरा आहेत ? एखाद्या मुलीने आईला प्रश्न विचारला तर आई उत्तरते की तुझ्या आज्या पणज्यापासून असंच चालत आलं आहे म्हणून करायचं ! असं उत्तर तिला मिळतं ! आपली शिक्षणव्यवस्था अशी की त्यामधून या रूढींचा, या विधींचा अर्थ सांगितला जात नाही ! पण खरोखरच हेच विधी का करायचे ? याला काही कारणे असतील ना ? आज गौरीचा सण उत्साहाने साजरा होतोच ! त्याच्या सजावटीतही खर्च होतोच पण गौरीची पूजा केल्याने, मुलांना नोकरी मिळेल. वर्षभर काही कटकटी येणार नाहीत, ही मनोवृत्ती वाढत आहे.

## गौर कोणाची खड्याची, कोणाची तेरड्याची !

आपल्याकडे काही ठिकाणी गौरीच्या मुखवट्याची पूजा होते, तर काही ठिकाणी नदी, झरे, विहीर अशा पाण्याच्या ठिकाणाहून खडे आणून त्याची प्रतिष्ठापना करून पूजा केली जाते. तर काही ठिकाणी तेरड्याचे झाड घेऊन त्याची पूजा होते. गौरी घरात आणताना वाजत-गाजत, घंटा वाजवत आणतात. घरातली कुमारिका गौर आणते. घरात रांगोळीने पावले रेखली जातात. प्रत्येक खोलीत कुमारिका गौर घेऊन जाते. गौरीला घर दाखवले जाते. "गौरी गौरी काय पहाते धनधान्य समृद्धी !" अशी प्रश्नोत्तरे होतात. दुसऱ्या दिवशी गौरीसाठी खास जेवण ! नैवेद्य केला जातो. स्त्रिया स्वतःच्या उंचीइतके सूत घेऊन ते १६ पदरी करतात. हळदीमध्ये बुडवून गौरी समोर ते १६ पदरी सूत ठेवले जाते. या रात्री गाणी, फुगड्या खेळून गौर जागवली जाते. तिसऱ्या दिवशी गौरीसमोर ठेवलेला दोरा घेऊन त्याला १६ गाठी मारून स्त्री तो गळ्यात बांधते. त्याच दिवशी नदी विहिरीवर गौरीचे विसर्जन करतात. गौरीचे विसर्जन करण्यास जाताना मागे बघत नाहीत. गौरीचे विसर्जन करून येताना मूठभर वाळू घेऊन येतात आणि ती घरी सर्व खोल्यात फेकतात. या सर्व विधीबरोबरच गौरीची कहाणी वाचतात. या कहाणीत एक गरीब मनुष्य आहे. तो गरीबीने हताश होऊन जीव देण्यास निघाला आहे. एवढ्यात त्याला एक विवाहीत वृद्ध स्त्री भेटते. नदीवर जीव द्यायला गेलेल्या त्या गरीब माणसाचे मन ही म्हातारी ओळखते. व त्याच्यासह घरी येते. ती घरी आल्यावर त्याच्या घरी समृद्धी वाढते. म्हाताऱ्या स्त्रीची परत जाण्याची वेळ येते. तो पोहोचवायला नदीकाठी जातो. तिथे ती त्याला मूठभर वाळू देऊन सर्व घरात फेकण्यास सांगते आणि दर भाद्रपदात असेच करण्यास सांगते !

महाराष्ट्रातील अनेक घरात वर्षानुवर्षे अशाच तऱ्हेने गौरीचा उत्सव साजरा केला जातो.

## गौरीचं आगमन हे असं झालं !

आपल्या प्राचीन समाज जीवनाबद्दल, रीतीरिवाजांबद्दल मौलिक संशोधन अनेक विद्वानांनी केले आहे. आपल्या पूर्वजांचे समाजजीवन मधला भूतकाळाचा पडदा फाडून आपण पाहू आणि मग आजचे देवदेवता हे माणसानीच निर्माण केलेले आहेत ते लक्षात येईल ! एवढेच नव्हे तर आजची देवी म्हणजे कोणी अलौकिक नव्हे तर आपलीच पूर्वज आहे हेही लक्षात येईल.

आपले प्राचीन पूर्वज अतिशय वेगळे असे समाज जीवन जगत होते. आजचा समाज अनेक युगातून बदलत आलेल्या समाजाचे रूप आहे. आपले प्राचीन पूर्वज टोळी करून रहात. शिकार करून हिंडत. उपजीविका करत.

हळूहळू शेतीचा शोध लागला. आणि आपले पूर्वज शिकारीबरोबर शेतीकडेही लक्ष देऊ लागले. शेतीच्या अतिशय प्राथमिक अवस्थेत स्त्रियाच शेती करीत असत. शेतीचा शोधही स्त्रियांनीच लावला. प्राचीन काळात शेतीप्रधान समाजात शेतीवर स्त्रियांचे वर्चस्व होते. यामुळे इथे स्त्री – सत्ताक व्यवस्था होती. म्हणजेच आर्थिक सामाजिक जीवनावर स्त्रियांचे वर्चस्व होते. पशुपालन अवस्थेत समाज असताना तेथे पुरुषांचे वर्चस्व राहीले. आज भारतातच जर आपण आपल्या आजूबाजूला असलेल्या आदीवासी समाजाकडे पाहिले तर त्यांचे सामाजिक, सांस्कृतिक जीवन व आपले यामध्ये मोठा फरक दिसून येईल.

आसाममधील खासी जमात ही मोठ्या प्रमाणावर शेतीवर अवलंबून आहे. पण त्यांची शेती करण्याची पद्धत अतिशय प्राथमिक अवस्थेत आहे. नांगराचा वापर होत नाही. इथे स्त्री-सत्ता मातृसत्ता आहे. स्त्री केवळ कुटुंबाची प्रमुख नाही तर ती जमातीचीही प्रमुख आहे. संपत्तीची मालकी स्त्रीकडे आहे. इथे जी पूर्वजांची पूजा होते ते पूर्वज मोठ्या प्रमाणावर स्त्रियाच आहेत. आजारीपण बरे करणाऱ्या आणि मृत्यू आणणाऱ्या शक्ती या स्त्री रुपीच आहेत. धर्मगुरुही स्त्रियाच आहेत. शेतीच्या प्राथमिक अवस्थेत स्त्रीचे शेतीमध्ये प्रधान काम राहिले, असे अनेक देशातील इतिहासावरून सिद्ध होते.

प्राथमिक अवस्थेतील शेतीप्रधान समाजामध्ये स्त्रीला महत्त्वाचे स्थान होते. नांगराचा वापर न करता एखाद्या अणकुचीदार दगडाने खणून स्त्रिया बी पेरत असत. या प्राथमिक अवस्थेतील शेतीसाठी फार मोठ्या शारिरीक बळाची गरज नव्हती. स्त्रीला महत्त्वाचे स्थान प्राप्त होण्याचे दुसरे कारण म्हणजे स्त्रीची प्रजोत्पादन शक्ती आणि जमिनीची धान्य देण्याची शक्ती एकच मानली गेली. मानवाला नैसर्गिक नियमांचे आकलन नव्हते. त्यामुळे शेतीमध्ये भरघोस पीक हवे असेल तर शेतात जाऊन स्त्रीने पुरुषाबरोबर मैथुन केले पाहिजे. अशा प्रकारचे समृद्धिविधी होत असत. स्त्रीची गर्भधारणा व जमिनीची सुफलता याचा संबंध लावला गेला. विश्वातील निर्मिती शक्ती स्त्रीकडेच आहे असे मानले जात होते. आकाशाकडे देवतांना महत्त्व आले, स्त्रीची पूजा होत असे, ती याच काळात ! पशुपालन व शेतीच्या प्रगत अवस्थेत मानवी जीवन गेल्यावर त्यावर पुरुष वर्चस्व आले. पशुपालन अवस्थेतील समाजातील देवता या प्रामुख्याने पुरुषरुपी आहेत, तर प्राथमिक अवस्थेतील शेती होत असताना देवता या स्त्रीरुपी आहेत.

गौरीची पूजा करण्यामागे एकेकाळी स्त्रीने लावलेला शेतीचा शोध आणि अतिशय प्राथमिक अवस्थेत शेतीवरचे तिचे वर्चस्व कारण आहे. हे गौरीच्या उत्सवातील विधीवरून स्पष्ट होते.

पीक चांगले यावे, धान्याने घर भरावे, अशी मागणी गौरीकडे केली जाते. गौरीच्या व्रताची मुळे शेतीप्रधान समाजात सापडतात. सर्व विधी पीक चांगले यावे यासाठी आहेत. आणि म्हणूनच गौरीची म्हणजे पर्यायाने शेतीचा शोध लावणाऱ्या स्त्रीची पूजा भाद्रपदात केली जाते. दोऱ्याचे १६ पदर आणि १६ गाठी हे भाताचे पीक येण्यासाठी लागणाऱ्या १६ आठवड्याचे प्रतीक आहे. भाद्रपद महिन्याआधी पेरण्या झालेल्या असतात. पीक चांगले यावे म्हणून स्त्री देवतेची पूजा केली जाते. नदीकाठी शेती केली जाई म्हणून तेथील वाळू आणून घरभर पसरायची. प्राथमिक अवस्थेतल्या धर्मामध्ये हे असे विधी होते. पुढे या विधीला पापपुण्याची जवळीक आली. अशा विधीतून पापपुण्याची, पारलौकिकाची भिती घातली गेली.

गौरीच्या पुजेमागे हा इतिहास आहे. यावरून एक गोष्ट लक्षात येईल की, देवीचे काही करायचे राहीले म्हणून मूल आजारी पडले असा विचार केला जातो, त्याला काहीच आधार नाही. देवांची निर्मिती ही अशी माणसाने केली आहे !

म्हणूनच धर्म, रुढी, कर्तव्यकर्मे यामागे असलेला इतिहास डोळसपणे पहायला हवा. गुलामीच्या बेड्या यामधूनच आलेल्या आहेत ! त्याच तोडायला हव्यात !

—लता भिसे

(लोकायत : देवीप्रसाद चट्टोपाध्याय यांच्या ग्रंथावरून)